**ठळक बातम्या**

- वन्यजीवन व्यवस्थापनासाठी पारंपरिक ज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वापर करण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणानं प्रारंभ /अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात सादर

- महाराष्ट्र विधान परिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

- भारत आणि नेपाळ यांच्यात मल-नि:सारण, आरोग्य विज्ञान आणि कचरा व्यवस्थापनाबाबत सहकार्य वाढवण्याबाबत सामंजस्य करार

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत उद्या भारताची ऑस्ट्रेलियाशी लढत

**<><><><><><>**

वन्यजीवन व्यवस्थापनासाठी पारंपरिक ज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वापर करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमधे जुनागढ जिल्ह्यात सासण – गीर इथं राष्ट्रीय वन्यजीवन मंडळाची सातवी बैठक प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज झाली. त्यावेळी ते बोलत होते. नदीतल्या डॉल्फिन विषयीचं पहिलं वहिलं सर्वेक्षण त्यांनी प्रकाशित केलं. डॉल्फिन संवर्धना विषयी स्थानिक रहिवाशांमधे

जागृती निर्माण करावी, असं मोदी यांनी सांगितलं. देशातल्या सिंहगणनेची १६वी फेरी यंदा घेण्यात येईल, असं सांगत त्यांनी बार्डा अभयारण्यात सिंहांच्या जतनासाठी मदत जाहीर केली. याखेरीज देशात अन्यत्र चित्ते आणण्याचा, नदीकाठच्या परिसरात व्याघ्र जतन आणि मगरींचं जतन करण्याची योजना असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. माळढोक पक्षी आणि अस्वलाच्या प्रजातींचं जतन करण्यासाठीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याचं प्रकाशनही त्यांच्या हस्ते झालं. वन्यजीवनातले संघर्ष टाळण्याच्या दृष्टीनं जलद प्रतिसाद पथकांना आधुनिक तंत्रज्ञान दिलं जाईल असं त्यांनी सांगितलं. या विषयाच्या संशोधन आणि अभ्यासाकरता तमिळनाडूत कोईमतूर इथं उत्कृष्टता केंद्राची स्थापना करण्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली.

<><><><><><>

महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने आजपासून मुंबईत प्रारंभ झाला. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी अभिभाषणात केलं. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनात राज्याचं १४ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान असून थेट परकीय गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पहिली पसंती आहे, असं ते म्हणाले. दावोसमध्ये झालेल्या १५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या सामंजस्य कराराचा उल्लेख करुन ते म्हणाले की यातून १५ लाख

रोजगारनिर्मिती शक्य आहे. उद्योगांना चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी ५ हजार कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्याची राज्य सरकारची योजना आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल राज्यपालांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे आभार मानले. राज्य सरकार या अंतर्गत उत्कृष्टता केंद्र आणि अनुवाद प्रबोधिनी स्थापन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न सोडवण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><><>**

राज्य सरकारनं अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आज दोन्ही सभागृहात सादर केल्या. विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या मांडल्या. त्यात सर्वाधिक ३ हजार कोटी रुपयांहून अधिक मागण्या ग्रामविकास विभागाच्या आहे. या मागण्यांवर ६ आणि ७ मार्च रोजी चर्चा आणि मतदान होणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव दोन्ही सभागृहात मांडण्यात आला.  कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयानं २ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. याप्रकरणी सरकारनं भूमिका मांडावी, अशी मागणी विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. याप्रकरणी न्यायालयाचा निर्णय आल्यावर राज्यपाल किंवा विधानसभा निर्णय घेईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं.

दोन्ही सभागृहांमधे माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग, तसंच दिवंगत सदस्यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मंजूर झाल्यावर कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.

**<><><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ७ मार्च रोजी सर्व लाभार्थ्यांना दिला जाईल. मार्च महिन्याचा हप्ता अर्थ खात्यातून निधी मिळाल्यानंतर देऊ, अशी माहिती महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधान भवन परिसरात दिली. २ कोटी ४० लाखांपेक्षा अधिक महिला या योजनेच्या लाभार्थी असल्याचं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट तटकरे (१९ सेकंद)**

**<><><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं विधान परिषदेच्या ५ जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं त्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होते आहे. विधानसभा आमदारांच्या मधून ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी १० मार्चला अधिसूचना जाहीर होईल. अर्ज दाखल करण्यासाठी १७ मार्चपर्यंत मुदत आहे. १८ मार्चला अर्जांची छाननी झाल्यावर २० मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता वाटली तर २७ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

**<><><><><><>**

भारत आणि नेपाळ यांच्यात आज नवी दिल्ली इथं मल-नि:सारण, आरोग्य विज्ञान आणि कचरा व्यवस्थापनाबाबत सहकार्य वाढवण्याबाबत सामंजस्य करार झाला. दोन्ही देशातल्या नागरिकांना शुद्ध पेयजलाची

उपलब्धता करून देण्यासाठी सहकार्य करण्याचा मुद्दाही या करारात अंतर्भूत आहे. या कराराच्या माध्यमातून दोन्ही देशातलं सार्वजनिक आरोग्य, शाश्वतता, आणि प्रादेशिक सहकार्य वृद्धिंगत होईल असा विश्वास केंद्रीय जल शक्ती मंत्री सी आर पाटील यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

**<><><><><><>**

आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताची लढत आता ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. उपांत्य फेरीचा हा पहिला सामना उद्या दुपारी अडीच वाजता दुबई इथं रंगणार आहे. उपांत्य फेरीचा दुसरा सामना ५ मार्चला न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन संघांदरम्यान लाहोर इथं होणार आहे. उपांत्य फेरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या सामन्यात विजयी ठरणारे संघ ९ मार्चला होणाऱ्या अंतिम सामन्यात झुंजणार आहेत.

**<><><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज लखनऊ इथं गुजरात जायंट्स आणि यूपी वॉरिअर्स यांच्यात सामना सुरू आहे. यूपी वॉरिअर्सननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात जायंट्सच्या ९ षटकांत १ बाद ७३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

शिक्षणाबरोबरच संशोधनावरही विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित अभ्यागत परिषदेच्या उदघाटन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सरकारनं एका चांगल्या उद्देशानं राष्ट्रीय संशोधन फंड सुरु केला असून उच्च शिक्षण

संस्थांनी या उपक्रमाचा लाभ घेत संशोधनाला प्रोत्साहन द्यावं, असंही त्या म्हणाल्या. कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा स्तर त्या देशाच्या शिक्षण प्रणालीतून दिसून येत असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताला ज्ञान अर्थव्यवस्थेचं केंद्र म्हणून स्थापित करण्यात उच्च शिक्षण संस्था प्रमुखांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचं त्या म्हणाल्या.

<><><><><>

व्हेवज शिखर परिषदेत चित्रपट निर्मितीविषयी मास्टरक्लासचं आयोजन करण्यात आलं आहे. ॲनिमेशन फिल्म मेकर्स कॉम्पिटेशन स्पर्धेच्या विजेत्यांना यात मार्गदर्शनाचा लाभ घेता येईल. यात उद्या गुनीत मोंगा यांचं, ५ मार्च रोजी अर्नी ओले लोपेज, ६ मार्च रोजी अनुसिंह चौधरी हे मार्गदर्शन करतील. मास्टरक्लासमधे शोबू यार्ला गड्डा यांनी आज मार्गदर्शन केलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या वेव्ज या कार्यक्रमाचा हा उपक्रम १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

<><><><><>

वेव्ज समिट २०२५ अंतर्गत संगीत क्षेत्रासाठी बॅटल ऑफ बँड्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्रसार भारती आणि सारेगामा यांनी संयुक्तरित्या या स्पर्धेचं आयोजन केलं असून त्यात विविध बँड्सना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.

//<><><><><>//